आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२२ एप्रिल २०२५ – मंगळवार

<u>ठळक बातम्या</u>

- पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात काही पर्यटकांचा मृत्यू, राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून शोक व्यक्त, परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा रवाना

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सौदी अरेबियाचे प्रधानमंत्री युवराज मोहंम्मद बिन सलमान यांच्यात द्विपक्षीय चर्चा

- लोकप्रतिनिधींना संविधानाचा आशय ठरवण्याचा सर्वोच्च अधिकार असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं प्रतिपादन

- UPSC च्या २०२४ च्या नागरी सेवा परीक्षांचा निकाल जाहीर, पुण्याचा अर्चित डोंगरे देशात तिसरा

- देशात सोन्याच्या दरानं गाठला तोळ्यामागे १ लाख रुपयांचा टप्पा

<><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये अनंतनाग जिल्ह्यात पहलगाममधल्या बैसरण भागात पर्यटकांच्या एका गटावर दहशतवाद्यांनी हल्ला केला आहे. यात काही जणांचा मृत्यू झाला असून जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. यासंदर्भात अधिक माहिती गोळा करण्याचे प्रयत्न सुरू असून परिस्थिती स्पष्ट झाल्यावर मृतांचा अधिकृत आकडा समोर येईल, असं जम्मू काश्मिरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सांगितलं आहे.

या हल्ल्यातल्या मृतांच्या कुटुंबीयांप्रती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सहवेदना व्यक्त केल्या आहेत. पर्यटकांवर हल्ला करण्याचा हा प्रकार धक्कादायक आणि वेदनादायक असल्याचं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. तर हल्लेखोरांना कठोर शिक्षा दिली जाईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. दहशतवादाविरुद्ध लढण्याचा आपला निर्धार अढळ असून तो आणखी मजबूत होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून या हल्ल्यात सहभागी असलेल्यांना कठोर शासन केलं जाईल, असं शहा म्हणाले आहेत. शहा यांनी सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असलेल्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना या हल्ल्याच्या घटनेची माहिती दिली असून तातडीची सुरक्षा आढावा बैठक घेण्यासाठी ते श्रीनगरला रवाना झाले आहेत. त्याआधी गृहमंत्र्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. जम्मू आणि काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह देशभरातल्या राजकीय नेत्यांनी आणि इतर मान्यवरांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे.

<><><><>

सौदी अरेबियाच्या दोन दिवसीय दौऱ्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जेद्दाह इथं पोचले. सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री मोहम्मद बिन सलमान यांच्यासह प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली दुसऱ्या धोरणात्मक भागीदारी परिषदेची बैठक सध्या सुरु आहे.

विशेष सन्मान म्हणून, सौदी हवाई क्षेत्रात प्रवेश केल्यापासून सौदीच्या शाही वायूदलातल्या एफ-१५ लढाऊ जेट विमानांनी मोदी यांच्या विमानाची सोबत केली. विमानतळावर २१ तोफांची सलामी देऊन त्यांचं स्वागत करण्यात आलं. तिथल्या भारतीय समुदायानं सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाला मोदी उपस्थित राहिले. त्यानंतर रिट्झ-कार्लटन इथं भारतीय समुदायाला त्यांनी संबोधित केलं.

या दौऱ्यामुळे भारत आणि सौदी अरेबिया यांच्यातली मैत्री दृढ होईल, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमाद्वारे म्हटलं आहे. आज आणि उद्या विविध कार्यक्रमांमधे सहभागी होण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

भारत आणि अमेरिकेनं व्यापारविषयक चर्चेसाठीच्या शर्ती अधिकृतरित्या निश्चित केल्या आहेत, असं अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हॅन्स यांनी आज जाहीर केलं. ते जयपूर इथं आयोजित व्यापार परिषदेत बोलत होते. आयात कर आणि व्यापारविषयक चर्चेबाबत ते म्हणाले की, दोन्ही देशांकडे एकमेकांना देऊ करण्यासाठी बरंच काही आहे. भारत हा संरक्षणक्षेत्रातला अमेरिकेचा सर्वात जवळचा आणि अत्यंत विश्वासू भागीदार आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी काल अमेरिकेत सॅन फ्रांसिस्को इथं माहिती तंत्रज्ञान उद्योगातल्या अनेक मातब्बरांची भेट घेतली. विविध कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी झालेल्या भेटींमधे त्यांनी तांत्रिक सहयोग आणि गुंतवणुकीच्या संधीचा लाभ घेण्याचं आमंत्रण दिलं. केंद्रसरकारनं राबवलेल्या सुधारणांबाबत त्यांची मतं सीतारामण यांनी जाणून घेतली. तसंच सध्याच्या धोरणांत्मक चौकटीबाबत निरीक्षण आणि प्रतिसादही जाणून घेतले.

<><><><>

जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींना संविधानाचा आशय ठरवण्याचा सर्वोच्च अधिकार असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. ते आज दिल्ली विद्यापीठात आयोजित कार्यक्रमाला संबोधित करत होते. संसद ही सर्वोच्च स्थानी असून, संविधान कोणत्याही अधिकाराला संसदेच्या वरचं स्थान देत नाही, असं ते यावेळी म्हणाले.

नागरिकांनी आपली अभिव्यक्ती, आकांक्षा आणि इच्छा प्रतिबिंबित करण्यासाठी आपल्या प्रतिनिधींची निवड केली असून, निवडणुकांमध्ये ते या प्रतिनिधींना जबाबदार धरत असल्याचं धनखड यांनी सांगितलं.

<><><><>

UPSC च्या २०२४ च्या नागरी सेवा परीक्षाच्या निकालात शक्ती दुबे देशात पहिल्या क्रमांकावर आहे. हर्षित गोयल दुसऱ्या आणि पुण्याचा अर्चित डोंगरे देशात तिसऱ्या स्थानी आणि राज्यात पहिल्या स्थानी आहे. त्यानं वेल्लोर इथल्या व्हीआयटीमधून इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीमध्ये पदवी शिक्षण घेतले असून युपीएससी परीक्षेत तत्वज्ञान हा पर्यायी विषय घेतला होता. शिवांश सुभाष जगदाळे राष्ट्रीय पातळीवर २६व्या स्थानी आहे. देशातल्या पहिल्या १०० मध्ये राज्यातले ७ उमेदवार आहेत.

यावेळी एकूण १००९ उमेदवारांची विविध नागरी सेवांसाठी निवड झाली आह. त्यात १८० IAS साठी, ५५ IFS साठी आणि १४७ उमेदवार IPS साठी निवडले गेले आहेत. यामध्ये एकूण ९० विद्यार्थी महाराष्ट्रातले आहे.

<><><><>

देशात सोन्याच्या दरानं आज तोळ्यामागे १ लाख रुपयांची पातळी ओलांडली. इंडियन बुलियन अँड ज्वेलरी असोसिएशनने दिलेल्या दरांनुसार दिवसअखेर २४ कॅरेट सोनं प्रति तोळा १ लाख १ हजार ४०० रुपयांपेक्षा महाग मिळत होतं. सकाळी २२ कॅरेट सोन्याचे दर १ लाख १ हजार ६०० रुपयांपेक्षा अधिक झाले होते मात्र संध्याकाळी ते ९९ हजारांपर्यंत खाली घसरले. कालच्या तुलनेत सोनं सुमारे अठराशे रुपयांनी महाग झालं. चांदी सुमारे ९८ हजार ५०० रुपये किलोनं मिळत होती. कमोडिटी बाजारातही सोन्याचे व्यवहार १ लाख रुपयांच्यावर होत होते.

जगभरातल्या केंद्रीय बँकांनी वाढवलेली सोनं खरेदी तसंच सोनं ही सुरक्षित गुंतवणूक वाटत असल्यानं गुंतवणूकदार सोनं खरेदीकडे वळत असल्याचं तज्ञांचं मत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकन फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांच्यातल्या तणावामुळेही सोन्याचा दर वाढल्याचं तज्ञ म्हणतात.

<><><><>

मुंबईत वेव्हज परिषदेचं आयोजन होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भारत पेव्हिलियनचं उद्घाटन होणार आहे. भारताचा कथाकथनाचा वारसा तसंच जागतिक स्तरावर माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात भारताचा वाढता दबदबा यांचं प्रतिनिधीत्वि हे पेव्हिलियन करेल. सर्जनशीलता, सौहार्द आणि सांस्कृतिक मुत्सद्देगिरी हे भारतीय  कला परंपरेचे अभिन्न अंग आहेत, हे या पेव्हिलियनच्या माध्यमातून दिसून येईल. श्रुती, कीर्ती, दृष्टी आणि निर्मिकाची झेप असे या पेव्हिलियनचे चार भाग असतील.

<><><><>

राज्यातल्या पहिली ते पाचवीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी भाषा अनिवार्य नव्हे तर ऐच्छिक करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यासंदर्भात तज्ञांशी चर्चा करुन लवकरच शासन निर्णय जारी केला जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी मंत्रालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत दिली. राष्ट्रीय शिक्षण धोरणात ३ भाषा धोरण सुचवलं आहे.

<><><><>

देशाच्या काही राज्यांमध्ये उष्णतेची तीव्र लाट आली असून, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी कामगार आणि कष्टकरी वर्गाचं त्यापासून संरक्षण करण्यासाठी तातडीनं उपाययोजना कराव्यात, अशी सूचना केंद्रसरकारनं जारी केली आहे. वातावरणातल्या उष्म्याची पातळी लक्षात घेऊन, कामगारांच्या कामाचे तास पुन्हा निश्चित करावेत, पिण्याचं पुरेसं पाणी उपलब्ध करावं, कामगारांच्या आरोग्याची नियमित तपासणी करावी, असं यात  म्हटलं आहे. राज्य कर्मचारी विमा मंडळा अंतर्गत रुग्णालयांनी उष्माघाताच्या प्रकरणांसाठी समर्पित डेस्क आणि उष्णतेशी संबंधित आजारांसाठी ओआरएस, आईस पॅक आणि इतर आवश्यक साहित्य उपलब्ध करावं, तसंच कारखाने, बांधकाम, वीटभट्ट्या आणि खाण  कामगारांकडे विशेष लक्ष द्यावं अशी सूचना देण्यात आल्याचं मांडवीय यांनी सांगितलं.

<><><><>

कॅथलिक ख्रिश्चन धर्मगुरु पोप फ्रान्सिस यांच्यावर शनिवारी अंत्यसंस्कार होणार आहेत अशी माहिती व्हॅटिकन चर्चने दिली आहे. रोममधल्या बॅसिलिका ऑफ सेंट इथं अंतिम विधी होतील. पोपनी त्यांच्या बारा वर्षांच्या कार्यकाळात जिथं वास्तव्य केलं त्या सांता मार्था या निवासस्थानी त्यांची शवपेटीका अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

भारत सरकारने पोप फ्रान्सिस यांना आदरांजली म्हणून तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला आहे.

<><><><>

स्टार्टअपसह इतरांना यावर्षी आण्विक क्षेत्रात गुंतवणुकीची संधी उपलब्ध करुन दिली जाईल, अशी घोषणा केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी दिली आहे. विविध संशोधन संस्थांमध्ये समन्वयाची गरज त्यांनी व्यक्त केली. हैदराबादमध्ये CSIR स्टार्ट अप कॉन्क्लेव्हच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

//<><><><><>//